# दि भंडारा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,भंडारा

## मुख्यालय -भंडारा

जे एम पटेल कॉलेज रोड, सिव्हिल लाइन, भंडारा - ४४१९०४, महाराष्ट्र, भारत
दुरध्वणी क्र. 07184-252415

नोकरभरतीची विस्तृत जाहीरात

दि भंडारा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,भंडारा या बँककरीता विविध श्रेणीतील रिक्त ११८ पदे सरळसेवा भरतीव्दारे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून निवड सुची तयार करणेसाही विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यांत येत आहेत. बँकेचे संकेत स्थळ bhandaradccb.com किंवा bhandaradccb.in या संकेत स्थळावर अर्ज भरणे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | संकेत स्थळावर अर्ज भरणे | २४/०७/२०२४ ते ०२/०८/२०२४ |
| 2 | ऑनलाईन परिक्षा शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिनांक | ०२/०८/२०२४ |
| 3 | ऑनलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर (website) अलाहिदा (प्रकाशीत) करण्यात येईल |
| 4 | ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यांचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर (website) अलाहिदा (प्रकाशीत) करण्यात येईल |
| 5 | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर (website) अलाहिदा (प्रकाशीत) करण्यात येईल |

**पदाचे नाव:- लिपीक- ९९ पदे**

| अ. क्र. | समांतर आरक्षण (लिपिक पदांकरिता ) | पदांची संख्या | समांतर आरक्षण व पदांची संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंप ग्रस्त | महीला | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | सर्वसाधारण |
| 1 | अ.जाती | १३ | २ | १ | - | ४ | १ | १ | ४ |
| 2 | अ.जमाती | ७ | १ | - | - | २ | - | १ | ३ |
| 3 | वि.जा. (अ) | ३ | - | - | - | १ | - | - | २ |
| | भ.ज. (ब) | २ | - | - | - | १ | - | - | १ |
| | भ.ज. (क) | ३ | - | - | - | १ | - | १ | १ |
| | भ.ज. (ड) | २ | - | - | - | १ | - | - | १ |
| 4 | विशेष मा. प्रवर्ग | २ | - | - | - | १ | - | - | १ |
| 5 | इ. मा. व. | १९ | ३ | १ | - | ६ | १ | २ | ६ |
| 6 | आ.दू.घ. | १० | २ | १ | - | ३ | १ | १ | २ |
| 7 | खुले | ३८ | ६ | २ | १ | ११ | २ | ४ | १२ |
| | **एकुण** | **९९** | **१४** | **५** | **१** | **३१** | **५** | **१०** | **३३** |

दिव्यांग/ अपंग - ४ पद

अनाथ- १ पद

**पदाचे नाव:- शिपाई -१९ पदे**

| अ. क्र. | समांतर आरक्षण (शिपाई पदांकरिता ) | पदांची संख्या | समांतर आरक्षण व पदांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | महीला | अंशकालीन कर्मचारी | सर्वसाधारण |
| 1 | अ.जाती | २ | - | १ | - | १ |
| 2 | अ.जमाती | १ | - | - | - | १ |
| 3 | वि.जा. (अ) | १ | - | - | - | १ |
| | भ.ज. (ब) | १ | - | - | - | १ |
| | भ.ज. (क) | १ | - | - | - | १ |
| 5 | इ. मा. व. | ४ | १ | १ | - | २ |
| 6 | आ.दू.घ. | २ | - | १ | - | १ |
| 7 | खुले | ७ | १ | २ | १ | ३ |
| | **एकुण** | **१९** | **२** | **५** | **१** | **११** |

दिव्यांग/ अपंग - १ पद

**सामाजिक व समांतर आरक्षण**

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक

- सदरचे आरक्षण हे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेले आहे.
- खुल्या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही.
- या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठीसाठी अर्जदाराच्या/ उमेदवाराच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न | रू.८.०० लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटूंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३ | ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापुर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी विहित नमुन्यातील निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**महिला आरक्षण**

- महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/कार्या-२, दि. ०४ मे २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर शासन निर्णयान्वये रद्द करणेत आलेली आहे.
- मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग,विमुक्त जाती (अ),भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क),भटक्या जमाती (ड) आणि विशेष मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू ईच्छिनाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्या प्रमाणे नॉन क्रीमिलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन क्रीमिलेयर प्रमाणपत्र महिला व बालविकास विभागाकडून तपासणी करून घेण्यात येईल.
- महिलांकरिता आरक्षित पदावर पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरुष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

H.O.

**खेळाडू**

- शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय दि. ०१ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक | क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७, शासन निर्णय दि. ३० जून २०२२ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडूंबाबत आरक्षण, क्रिडा विषयक प्रमाणपत्र पडताळणी वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.
- राष्ट्रीय स्तरावरील खेळ प्रतियोगितेमधे सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवाराने सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा संबंधित प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर न केल्यास त्याच टप्प्यावर खेळाडू आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल.
- खेळाडू आरक्षणासाठी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.

**माजी सैनिक**

- शासन परिपत्रक साप्रवि क्र. आरटीए १०७९/४८२/१६-अ दिनांक १६/०४/१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.
- माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
- तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही...
- सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए ९०९०/६२/प्र.क्र. २२२/९१/२८ मुंबई | दि. ३० डिसेंबर १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी | देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी | दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

**प्रकल्पग्रस्त**

- शासन निर्णय साप्रवि क्र. एईएम१०८०/३५/१६अ दिनांक २० जानेवारी १९८० व शासन निर्णय साप्रवि क्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे.
- प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित जिल्हयातील | जिल्हाधिकारी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे

**भूकंपग्रस्त**

- शासन निर्णय साप्रवि क्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ नुसार भुकंपग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे.
- उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहिल.
- उमेदवाराने सदर भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे

H.O.

**पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार**

- शासन निर्णय दि. २७ ऑक्टोबर २००९ अन्वये पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
- रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**अनाथ**

- अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ- २०१८/प्र.क्र.१२२/का-३, दि. ६ एप्रिल २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहिल.
- अनाथांसाठी "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहील. संस्थात्मक आरक्षण
- संस्थात्मक आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थांमध्ये पालन पोषण झाले आहे अशा बालकांचा समावेश असेल. (तसेच महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाची संबंधित संस्थांमध्ये तसेच महिला व बालविकास विभागाव्यतिरिक्त अन्य विभागांकडून मान्यता प्रदान करणेत आलेल्या अनाथालये अथवा तत्सदृश संस्थांमध्ये पालन झालेल्या अनाथांचा यामध्ये समावेश असेल.)

  संस्थाबाह्य आरक्षण:-

- संस्थाबाह्य आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थेबाहेर/ नातेवाईकाकडे संगोपन झालेले आहे अशा बालकांचा समावेश असेल. आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे महिला व बालविकास विभागाकडून निर्गमित करणेत | आलेले अनाथ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.
- अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गात करण्यात येईल.

**दिव्यांग**

- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.
- दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.
- दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग / पदाकरिता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल
- दिव्यांग आरक्षणाच्या पात्रतेकरीता दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.
- दिव्यांग व्यक्तीकरीताचे आरक्षण एकूण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यात येईल.
- सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद हे इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येईल.

H.O.

- दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संकेतस्थळावरून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
- दिव्यांग उमेदवार एखाद्या सामाजिक प्रवर्गातील असल्यास संबंधित सामाजिक प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार निवडीसाठी पात्र ठरण्यासाठी व परीक्षा शुल्कामधील सवलतीकरीता संबंधित जातीचे वैध कालावधीचे नॉन क्रिमीलेअर (लागू असल्यास) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
- सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णय दिनांक १२.१२.२०११ अन्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास ०६ महिन्यांचे आत, जात | वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधीत उमेदवारांना सेवेतुन कमी करण्यात येईल.
- वि.जा.(अ)/ भ.ज.(ब)/ भ.ज.(क)/ भ.ज.(ड)/ वि.मा.प्र., इमाव, ईडब्ल्यूएस या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलियर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले अलिकडील / नविनतम मूळ नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांका पर्यंत प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राची पडताळणी कागदपत्र तपासणीच्या वेळी करण्यात येईल.

•सूचना•

1. ऑनलाइन परिक्षा शुल्क संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरणा केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पुर्ण होणार नाही.
2. उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षा शुल्काची रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरणा करावे लागेल.
3. संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरते वेळी, अर्ज भरण्यास तांत्रिक अडचण आल्यास ८९५६६६०४०७ हा हेल्पलाईन क्रमांक आहे, अर्ज भरण्यास अडचण निर्माण झाल्यास support@bhandaradccb.in या मेल-आयडीवर ई-मेलव्दारे संपर्क साधावा. वरील हेल्पलाईन क्रमांक व मेल-आयडी फक्त काही तांत्रिक अडचणी (अर्ज भरते वेळी, मुलाखतपत्र डाउनलोड करते वेळी इत्यादी) निर्माण झाल्यास संपर्काकरिता आहे .
4. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत: चा ईमेल-आयडी मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे.
5. उमेदवारांने अर्ज भरतांना ज्या पदासाठी तो अर्ज करीत आहे त्या पदासाठी आवश्यक असणारी पात्रता धारण करीत असल्याची खात्री करूनच अर्ज भरावा. अपात्र अर्जाबाबत अर्जदारासोबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यांत येणार नाही.
6. सदर भरती प्रक्रीये दरम्यान बॅंकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या भरती प्रकीयेच्या अद्ययावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

विविध श्रेणीतील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज विहीत नमुन्यात सादर करण्यासाठीची पात्रता,निकष व इतर तपशिल खालील प्रमाणे.

अ. शैक्षणीक अर्हता :-

| पदाचे नांव | पद संख्या | वयोमर्यादा | आवश्यक शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|---|
| लिपीक | ९९ | खुल्या प्रवर्गातील उमेदवार वयोमर्यादा, जाहीरात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकास २१ वर्ष पूर्ण झाले असावे व ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>राखीव प्रवर्गातील उमेदवार वयोमर्यादा, जाहीरात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकास २१ वर्ष पूर्ण झाले असावे व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. . | कोणत्याही शाखेचा पदवीधर व MSCIT किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| शिपाई | १९ | खुल्या प्रवर्गातील उमेदवार वयोमर्यादा, जाहीरात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकास १८ वर्ष पूर्ण झाले असावे व ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>राखीव प्रवर्गातील उमेदवार वयोमर्यादा, जाहीरात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकास १८ वर्ष पूर्ण झाले असावे व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | १० वी पास. |

1. दिनांक २३/०७/२०२४ रोजी उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त व मूळ कागदपत्र असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील
2. उपरोक्त श्रेणीनिहाय रिक्त पदांची संख्या कमी किंवा पदांच्या संख्येत वाढ करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे. तसेच सदर भरती प्रक्रीया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करण्याचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.
3. समांतर आरक्षनासाठी घटकनिहाय राखून ठेवण्यात आलेल्या जागेवर सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे संबधीत समांतर आरक्षण घटकासाठी निश्चित केलेल्या कार्यपद्धती अवलंब करुण, त्या त्या सामाजिक प्रवर्ग गुणवत्तेवर देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
4. निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. उमेदवारास दि भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, भंडारा बँकेच्या भंडारा जिल्हयातील कोणत्याही शाखेमध्ये नियुक्ती देण्यांत येईल नियुक्तीचे ठीकाणी उमेदवारास १० दिवसाचे आत रूजू होणे आवश्यक राहील.

ब. वेतनश्रेणी

| | |
|---|---|
| लिपीक | २७५०-२२५-३८७५-२७५-५२५०-३२५-६८७५-४००-८८७५-४५०-१११२५-५००-१३६२५ |
| शिपाई | २३१०-१६५-३१३५-२००-४१३५-२५०-५३८५-३००-६८८५-३५०-८६३५ |

क. निवड कार्यपध्दती :-

1. ऑनलाईन परिक्षा :-

विविध श्रेणीतील पदांकरीता ऑनलाईन परिक्षा घेण्यांत येईल. सदर ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षेसाठी खालील विषयाच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश असेल. गणित, इंग्रजी व इंग्रजी व्याकरण,बँकींग व सहकार, सामान्य ज्ञान व चालू घडामोडी, जिल्हातील भौगोलीक परिस्तिथीती, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था, मराठी, संगणक व माहिती तंत्रज्ञान, बुध्दीमापन चाचणी. तसेच ऑनलाईन परिक्षेचे माध्यम मराठी असेल.

2. कागदपत्र पडताळणी व मुलाखत :-

ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमुद पदसंख्येच्या 1:3 प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल सदर मुलाखतीस पात्र उमेदवारांस मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबधित मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी बँकेकडून करून घेणे बंधनकारक राहील व मुलाखतीस ऑनलाईन पध्दतीने मुलाखतपत्र उपलब्ध करून दिले जाईल. सदर मुलाखतपत्र ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळावरून डाऊनलोड करावे. मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास support@bhandaradccb.in या मेल-आयडीवर ई-मेलव्दारे संपर्क साधावा. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवार बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल.

3. मुलाखत :-

कागदपत्रे पडताळणीमध्ये मुलाखतीस पात्र होणाऱ्या उमेदवारांची बँक गठीत समितीकडून मुलाखत घेण्यांत येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहील्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही. सदर मुलाखत १० गुणांची राहील.

4. उमेदवारांची अंतिम निवड सूची :-

उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेतील गुण ९० व मुलाखतीचे गुण १० यांची बेरीज करून एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे गुणांसह अंतिम निवडसूची व प्रतिक्षा यादी तयार करण्यांत येईल. त्याचप्रमाणे त्या श्रेणीतील पदसंख्या विचारात घेता, अंतिम निवडसूची व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांमध्ये भंडारा जिल्हयातील उमेदवार, उमेदवार धारण करीत असलेली उच्च / शैक्षणीक अर्हता, अनुभव, वयाची सेवाजेष्ठता व आडनावाच्या इंग्रजी अक्षरानुसार याक्रमाने प्राधान्य देवून अनुक्रमे उमेदवारांची यादी मर्यादित करण्यांत येईल.

H.O.

त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे / गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना बँकेच्या विविध हुद्याच्या पदी परिविक्षाधीन कालावधी करीता नियुक्ती देण्यात येईल.

5. परिविक्षाधीन कालावधी (प्रोबेशन पिरियड) :-

निवड करण्यांत आलेल्या उमेदवाराना 1 वर्षासाठी परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सेवेत नेमणुक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास त्या त्या श्रेणीसाठी लागु असलेल्या वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यात येईल. कायम सेवे साठी असलेल्या सवलती परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) पूर्ण झाल्यावर लागु करण्यात येतील. सदर उमेदवारास नेमणूकीबाबतच्या बँकेच्या स्थायी आदेशातील व सेवानियमावलीतील प्रचलित नियम, अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

ड. ऑनलाईन परिक्षा शुल्क :- शुल्क

ऑनलाईन परीक्षेकरीता सर्वसाधारण/खुला प्रवर्गासाठी रु.750+135(GST)= रु.885/- शुल्क आकारले जाईल. ऑनलाईन परीक्षेकरीता राखीव प्रवर्गासाठी रु.650+117(GST)= रु.767/- शुल्क आकारले जाईल. सदर ऑनलाईन परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील. एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परिक्षा किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही.

इ. ऑनलाईन परिक्षेसंदर्भात उमेदवारांना महत्वाच्या सुचना

1. उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.
2. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज दाखल केला किंवा तो त्या पदासीठीची अर्हता धारण करीत आहे म्हणजे ऑनलाईन परीक्षेस/ कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा/ नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
3. उमेदवारांनी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही पदाधिकारी / अधिकारी यांचेकडून शिफारस / दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याही टप्प्यावर अपात्र घोषीत करुन निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल.
4. ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवारांना सर्व मुळ कागदपत्रे घेवून हजर रहाणे बंधनकारक राहील. कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियेतून बाद समजण्यात येईल.
5. उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा, कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
6. यापुर्वी बँकेकडे याच पदासाठी प्रत्यक्ष कागदोपत्री किंवा मेलव्दारे अर्ज केले असतील तर त्यांचे पुर्वीचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाही. त्यांना नव्याने ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.
7. भरती प्रक्रियेत / निवड कार्यपध्दतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी कांही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात किंवा बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तीक स्वरूपात कळविले जाणार नाही.
8. उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने भंडारा शहरातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र परिक्षार्थींची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार इतर केंद्रावरही परिक्षा घेतली जाईल. परिक्षार्थींची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक सत्रांमध्ये घेण्यात येईल.
9. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
10. बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परिक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लीकेशन एजन्सीची नियुक्ती केलेली नाही. यांसदर्भात कोणतीही जाहीरात अगर माहिती ही बेकायदेशिर आहे असे समजण्यात यावे.
11. कांही अपरीहार्य / आपत्कालीन कारणास्तव परिक्षा स्थगित करणे/पुढे ढकलणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.
12. भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद / तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतीम राहील.
13. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी उमेदवारांना कागदपत्रे सादर करावयाची नसली तरी ज्या उमेदवाराकडे आवश्यक शैक्षणीक अर्हता असेल त्यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा.

H.O.

३. ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पध्दत :-

1. विविध पदाकरीता बँकेच्या bhandaradccb.com किंवा bhandaradccb.in या अधिकृत संकेत स्थळावरून ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपुर्ण प्रकीये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. त्याचप्रमाणे ई-मेल आयडी व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रीक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रीयेदरम्यान बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यांत येणाऱ्या भरती प्रक्रीयेच्या अद्यावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

2. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणीक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोटया माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यांत येईल. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना कांही चुकी झाल्यास किंवा त्रुटी राहील्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. विस्तृत माहितीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ. बाबतची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

3. उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी /छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या फक्त गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यांत येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यांत येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यांत येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

4. उमेदवारांना एका पदाकरिता एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करणारा उमेदवार आढळल्यास अशा उमेदवाराचा अर्ज छाननी प्रक्रियेत अपात्र करून निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.

5. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करावयाच्या सविस्तर सुचना बँकेच्या bhandaradccb.com किंवा bhandaradccb.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दिनांक ०२/०८/२०२४ रोजीपर्यंत खुला राहील.

6. ऑनलाईन परिक्षा शुल्काची रक्कम व अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्विकारले जाणार. अन्य कोणत्याही मार्गाने परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. ऑनलाईन परिक्षा शुल्क दिनांक ०२/०८/२०२४रोजी सांयकाळी 5.00 वाजेपर्यंत स्विकारले जाईल. ऑनलाईन परिक्षा शुल्क भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

7. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वतःचे अद्यावत "JPG/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन केलेले छायाचित्र (फोटो) व पांढ-या कागदावर काळया शाईच्या पेनाने स्वतः स्वाक्षरी करून स्कॅन केलेली "JPG/PNG" प्रकारची स्वाक्षरी स्कॅन करून bhandaradccb.com किंवा bhandaradccb.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेली इमेजची साईज 2MB पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज 2MB असावी (त्यापेक्षा जास्त मोठी फाईल अपलोड होणार नाही).

8. उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना स्वतःचे आधार कार्ड "JPG/PDF/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन करून bhandaradccb.com किंवा bhandaradccb.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहील पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधार कार्ड स्कॅन केलेल्या ईमेजची साईज 2MB पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी असावी.

H.O.

9. उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व सुचना (How to Apply) वाचून घ्याव्यात त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लीक (Click) करावे. आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहीरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर ऑनलाईन परिक्षा शुल्क भरावे

a) उमेदवारांनी त्यांचा अर्ज बँकेच्या संकेतस्थळावरून स्वतःच्या माहितीसाठी डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

b) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःची पूर्ण माहिती हि अचूक भरावी.

10. ऑनलाईन अर्ज वेबसाईटवर भरण्याची अंतिम तारीख दिनांक ०२/०८/२०२४ रोजी पर्यंत असून त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

11. ऑनलाईन परिक्षेची माहिती उमेदवारांस ई-मेल/ एस.एम.एस. व्दारे कळविण्यांत येईल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील, सदर माहिती पोस्टाव्दारे पाठविण्यांत येणार नाही. सदर भरती प्रक्रीये दरम्यान बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी भरती प्रक्रीयेची अद्ययावत माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. उमेदवारास परिक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

12. राखीव उमेदवारास नियुक्तीचे वेळी बँकेचे सेवेत रुजू होण्यापूर्वी त्या प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करावा लागेल. जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय बँकेचे सेवेत रुजू करून घेण्यात येणार नाही.

उपरोक्त पात्रता निकष व निवड प्रक्रीयेच्या निकषामध्ये बँकेने बदल केल्यास सदर बदलानुसार कार्यवाही करण्यांत येईल व तो बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.

दिनांक-२३/०७/२०२४

ठिकाण :- भंडारा

स्वाक्षरीत

मुख्य कार्यकारी अधिकारी

H.O.